दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ●मंगळवार दि.१९ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २६२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 19 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 263 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

लाडकी बहीण योजनेची फेरपडताळणी सुरू

पात्र लाभार्थी महिलांवर अन्याय होणार नाही, मंत्री अदिती तटकरे यांची ग्वाही

अलिबाग (वृत्तसंस्था)–मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या फेरपडताळणीवरून राज्यात संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. पण राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी ही फेरपडताळणी सुरू असली तरी पात्र लाभार्थी महिलांवर कोणताही अन्याय होणार नसल्याची ग्वाही दिली आहे.मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सरकारला मिळालेला डेटा हा प्राथमिक स्वरुपाचा आहे. या योजनेला आता एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यावेळी या योजनेंतर्गत २ कोटी ६३ लाख लाख महिलांची नोंदणी झाली होती. प्राथमिक पडताळणीत १० ते १५ लाख अर्जदार अपात्र ठरले होते. त्यानंतर आम्ही वेगवेगळ्या विभागांकडून त्यांच्याकडील लाभार्थ्यांची माहिती मागवली. माहिती तंत्रज्ञान विभागाने आम्हाला सर्व विभागाच्या २६ लाख लाभार्थींची माहिती दिली. त्यात काही लाभार्थी महिलांना अन्य योजनांचा लाभ मिळत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार काही महिला पहिल्याच पडताळणीत बाद ठरल्या.पत्रकारांनी यावेळी अंगणवाडी सेविकांनी गावातील संबंध बिघडण्याच्या भीतीने पडताळणीचे काम करण्यास असमर्थता दर्शवल्याविषयी प्रश्न केला. त्यावर अदिती तटकरे म्हणाल्या, सरकार प्रस्तुत महिला गरजू महिलांसाठी राबवत आहे. शासकीय सेवेत असतानाही या योजनेचा लाभ घेतला जात असेल तर शासन त्याविषयी योग्य तो निर्णय घेईल. या प्रकरणी कुणालाही चुकीचा लाभ मिळू नये यासाठी सरकार योग्य ती पाऊले उचलत आहे. त्यामुळे सर्वांनी अंगणवाडी सेविकांना पडताळणीसाठी सहकार्य करावे.सरकार जनतेला वेगवेगळ्या शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी कटिबद्ध आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ एखादी महिला घेत असेल तर तिला अपात्र ठरवले असेल, तर कदाचित त्या महिला दुसऱ्या एखाद्या योजनेचा लाभ मिळत असेल किंवा अधिकच्या उत्पन्नामुळे ती निकषात बसत नसेल. पण चुकीच्या पद्धतीने कुणालाही या योजनेचा लाभ मिळता कामा नये, असे अदिती तटकरे यांनी या प्रकरणी स्पष्ट केले.उल्लेखनीय बाब म्हणजे महायुती सरकारने गतवर्षीच्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली. याय योजनेंतर्गत पात्र महिला लाभार्थ्यांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य केले जाते. या पैशांमुळे महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, आरोग्य आणि पोषण सुधारण्यास मदत होते. ही योजना जुलै २०२४ पासून लागू झाली असून, पिवळे/केशरी रेशन कार्डधारक महिलांना उत्पन्नाच्या दाखल्याची गरज नाही. अर्ज ऑनलाइन किंवा ऑफलाइन अंगणवाडी/ग्रामपंचायत मार्फत करता येतो. या योजनेमुळे महिला सक्षमीकरणाला मोठी चालना मिळाली आहे.

आ.नमिता मुंदडा यांच्या हस्ते मेंढपाळांच्या मेंढ्यासाठी औषधी व लसीचे मोफत वाटप

मेंढपाळानी मेंढ्यासाठी मोफत औषध,लसीचा लाभ घ्यावा–प्रकाश जाडकर

केज । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सततचा पाऊस चालू असल्यामुळे बीड जिल्ह्यातील मेंढपाळांच्या मेंढ्यांना साथ रोगांचे आजार होत आहेत. केज मतदार संघाच्या आमदार सौ नमिताताई मुंदडा यांनी महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभागाला तातडीच्या सूचना देऊन मेंढ्यांना रोग प्रतिबंधक लस उपलब्ध करून मेंढपाळांच्या मेंढ्यांना लसीचा डोस पाजून आमदार सौ नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते कुंबेफळ येथे झाला

यापूर्वी मेंढपाळांना खाजगी रुग्णालयातून औषधी आणून हजार रुपये खर्च करावे लागत होते आता मोफत औषध उपचार व लसी देण्यात येत आहेत याचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार नमिता मुंदडा यांनी केले. मेंढपाळ बांधवांनी मोफत औषध उपचार व लसी घ्याव्यात असे आवाहन प्रकाश जाडकर यांनी केले .कुंबेफळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी चंदनसावरगाव पशुधन पर्यवेक्षक डॉ अनिकेत काटुळे , भाजप ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष प्रकाश जाडकर, सुरेश नांदे , गोपाळ मस्के, विष्णू थोरात, रामकृष्ण भंडारे, संदीप थोरात व परिसरातील मेंढपाळ उपस्थित होते .

शाळेसाठी आता निधी कमी पडू देणार नाही शालेय शिक्षण मंत्री भुसे यांचे प्रतिपादन

अमरावती (वृत्तसंस्था)–महापालिकेच्या शाळांमध्ये पाचशेहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, ही एक चांगली पटसंख्या असून गरजूंना चांगल्या प्रतीचे शिक्षण मिळावे, यासाठी शाळांचा विकास आवश्यक आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करून देऊ. यातून इमारती, स्वच्छतागृहे आणि पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. महापालिकेच्या जेवडनगर येथील शाळेत सामूहिक कवायतीचा कार्यक्रम पार पडला. या वेळी आ. रवी राणा, वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. नीलेश हेलोंडे, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, शिक्षण उपसंचालक नीलिमा टाके, शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख आदी उपस्थित होते. मंत्री भुसे म्हणाले, की विद्यार्थ्यांमध्ये देशाविषयी आदर निर्माण व्हावा, यासाठी शिस्तबद्ध कवायतीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक व्यायाम, नेतृत्वगुण विकसित होईल. कवायतीला देशभक्तीपर गाण्याची जोड दिली आहे, त्यामुळे लहान मुलांनी शिस्तबद्ध कवायत केली, या शब्दांत त्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले. शिक्षकांच्या सकारात्मक विचारांमुळे शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. अशा प्रयोगशील शाळांना नक्कीच मदत करण्यात येईल.यासोबतच पालकांनीही विद्यार्थी शाळेत येतील याची काळजी घ्यावी. मुले शिकल्याने कुटुंब, गाव आणि पर्यायाने देशाची प्रगती होऊ शकेल. त्यामुळे पालकांनी मुलांच्या शिक्षणाबद्दल जाणीवपूर्वक लक्ष द्यावे, असे सांगितले.या वेळी मंत्री भुसे यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या कवायतीचे शिस्तबद्ध सादरीकरण शाळेच्या विद्यार्थ्यांनी केले. सुरुवातीला लेझीम पथकाने मंत्री भुसे यांचे स्वागत केले. समर्पण संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी संजय अंबाडेकर, संजय पाटील, राजेश कोचे, प्रणिता निस्ताने, नीलेश शिरभाते, दीप्ती अग्रवाल, दिलीप मेश्राम, अलका बाबील, रत्नमाला खराटे, बद्रूनिसा सिकंदर, लक्ष्मीबाई देवगन, मोहन राठोड, डॉ. सुरेंद्रकुमार ढोले, चंदा खोडके यांच्यासह मनपाचे अधिकारी उपस्थित होते.

विवाहितेची दीर आणि चुलत्याने अश्लील भाषेत शिवीगाळ करून बदनामी केली

केज । गौतम बचुटे

रस्त्याने जात असलेल्या एका चोवीस वर्षीय महिलेला तिचा सख्खा दीर आणि चुलत्याने अश्लील भाषेत शिवीगाळ करून तिची बदनामी करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी दोघां विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १२ ऑगस्ट रोजी सायकाळी ६:१५ वा. च्या सुमारास केज येथे एक चोवीस वर्षीय विवाहित ही तिच्या सासु सोबत दवाखान्यात जात असताना, हॉस्पीटलच्या बाजूला रोडवर तिचा दिर सईद शाकेर शेख आणि तिचा चुलता सलाउद्दीन नवाब काझी हे दोघे हॉस्पीटलच्या बाजूला उभे होते. सईद शाकेर शेख याने तिला अश्लिल भाषेत शिवीगाळ केली आणि म्हणाला की, व्हाट्सअप ग्रुपवर बघ आणि तुझी जेवढी बदनामी झाली ती कमी झालीय का? असे म्हणाला. तसेच तिचा चुलता सलाउद्दीन नवाब काझी याने सुद्धा स्त्री जातीची बदनामी होईल अशा प्रकारे तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी विवाहितेच्या तक्रारीवरून केज पोलिस ठाण्यात तिचा दीर सईद शाकेर शेख, (रा. मेट्रो अपार्टमेंट छत्रपती संभाजीनगर) आणि चुलता सलाउद्दीन नवाब काझी (रा. केज ता. केज) या दोघांच्या विरुद्ध गु. र. नं. ४३४/२०२५ भा. न्या. सं. ७९, ३५१(२), ३५१(३) आणि ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपने हे तपास करीत आहेत.

बीड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात महिला ग्रामसभा घेण्यात यावे यासाठी एकल महिलाचे जिल्हाधिकारी यांना संघटनाचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात एकल महिला संघटना ही तळागाळातील पाच हजार महिलांच्या सोबत काम सुरू असून काम करत असताना महिलांच्या समस्या दूर करण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, महिला संपत्ती अधिकार मुद्यांवर काम करत असताना एकल विधवा, परितक्ता, घटस्फोट झालेल्या,निराधार, वृद्ध महिला, अपंग महिलांचे असंख्य समस्या आहेत आणि त्यांचे मूलभूत गरजा पूर्ण होण्यासाठी महिलांना ग्रामपंचायत च्या योजनांचा लाभ घेता यावा, महिलांचा सक्रिय सहभाग असावा, पूर्वी महिला ग्रामसभा घेणे बंधनकारक केले आहे. जेणेकरून महिला स्वतः पुढे येऊन प्रश्न मांढतील फक्त महिलांचा गावाच्या विकास कार्यक्रमात मर्यादित सहभाग राहू नये तर त्यांनी निर्णय प्रक्रियेत पुढे असावे त्यांची क्षमता वाढावी या हेतूने कर्तव्याची खऱ्या अर्थाने जाणीव होनार आहे या साठी महिला सभा अतिशय खूप महत्वाचे आहे ऑगस्ट मध्ये सर्वसाधारण ग्रामसभेत महिलांचे मूलभूत प्रश्न, शासकीय योजना, रोजगार हमी योजनांचे नियोजनबाबत चर्चा होऊन आराखड्यास मंजुरी संबंधित सभेत ठराव ठेवणाऱ्या विषयावर चर्चा होण्यासबंधी महिला सभा घेण्यात यावी व तसेचे तसेच मुद्दे ग्रामसभेत पारित करून सर्वसाधारण ग्रामसभेत ठरावात नमूद करावे यासाठी एकल महिला संघटना बीड जिल्हा वतीने संबंधित यंत्रणेला तसे पत्र काढावेत यासाठीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले यावेळी एकल महिला संघटनाच्या संजीवनी पखाले, ललिता सावंत, तेजस्विनी उबाळे, शिल्पा पंडित, तारा घोडके, प्रजावती जोगदंड, उर्मिला गालफडे, मंगल कानडे, कौशल्या कळसुले, रुक्मिणी नागापुरे यांच्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे

वंचित बहुजन आघाडीचा हल्लाबोल मोर्चा प्रा.चव्हाणांच्या नेतृत्वात तहसीलवर धडकणार

तालुक्यातील तमाम वंचित उपेक्षित गावकऱ्यांनो हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा–दिलीप माने

बीड । प्रतिनिधी

शिरुर(कासार) तालुक्यातील वर्षानु वर्ष कसत असलेल्या गायरान जमीनी नावावर करण्यात याव्या,पोटखराब जमिनीवर शासनाच्या वतीने पीक कर्ज देण्यात यावे,पारंपारीक गोंधळी,बँडबाजा व ईतर कलाकार यांना मानधन देण्यात यावे या सह ईतर प्रमुख मागण्या करीता वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड . प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने व प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश महासचिव तथा बीड जिल्हा प्रभारी प्रा . किसन चव्हाण सर यांच्या नेतृत्वात बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर भारत तांगडे सचिन मेघडंबर राजेंद्र पोकळे जिल्हा महासचिव खंडु जाधव जिल्हा संघटक डॉ गणेश खेमाडे सुदेश पोतदार अर्जुन जौंजाळ संदिप रोकडे जिल्हा सदस्य भिमराव चव्हाण भिमराव औसरमल सह शिरुर (कासार) तालुका पक्ष निरीक्षक पुरुषोत्तम वीर राजेशकुमार जोगदंड यांच्या प्रमुख उपस्थितीत मोर्चा संपन्न होत आहे . भारत स्वातंत्र्या नंतर ७८ वर्ष संपुष्टात आली तरी सुद्धा वंचित उपेक्षित घटकांतील नागरीकांना अन्न वस्त्र निवारा व मोफत शिक्षण या भारतीय संविधानीक हक्का पासुन वंचित रहावे लागत आहे . भारताला एक संघ व सुरक्षित ठेवणारा पवित्र ग्रंथ भारतीय संविधान होय . त्याचे अनुपालन करणे हे प्रत्येक भारतीयांचे आद्य कर्तव्य आहे . त्याच अनुषंगाने तालुक्यातील ज्वलंत मागण्यांची शासनाच्या वतीने अंमल बजावणी करण्यात यावी, करीता दि . २० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता जिजामाता चौक शिरुर(कासार) येथुन हल्ला बोल मोर्चास सुरुवात व तहसील कार्यालय येथे तहसीलदार यांना मागण्यां बाबत निवेदन सादर करण्यात येणार आहे . तमाम वंचित उपेक्षित अन्यायग्रस्त पिडितांनी मोर्चामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडी शिरुर (कासार) तालुकाध्यक्ष तथा हल्ला बोल मोर्चाचे आयोजक दिलीप माने यांनी केले आहे

विजेचा धक्का लागून शेतकरी ठार

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोरडेवाडी शिवारातील घाटेवस्ती येथे राहणारे शेतकरी बाबासाहेब रावसाहेब राख,वय ५५ वर्षे यांना सोमवारी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान विजेचा धक्का बसला.जखमी अवस्थेत त्यांना केज येथील उप जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी घेवून गेले असता डॉक्टरांनी त्यांची तपासणी करुन त्यांना मयत घोषित केले.सोमवारी दि.१८ आगष्ट रोजी सकाळी आठ वाजण्याच्या दरम्यान कोरडेवाडी शिवारातील घाटेवस्ती येथे राहणाऱ्या बाबासाहेब रावसाहेब राख,वय ५५ वर्षे यांना सोमवारी दि.१८ आगष्ट रोजी राहत्या घरी विजेचा धक्का लागून ते जखमी झालेहोते.त्यांना पुढील उपचारासाठी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात घेवून गेल्या नंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांची तपासणी करुन त्यांना मयत झाल्याचे घोषित केले.बाबासाहेब राख यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा असा परिवार असून सोमवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर कोरडेवाडी येथील स्मशानभूमीत अंत्य संस्कार करण्यात आले.

संपादकीय

मनस्तापाचा प्रवेश 'फेरा'

दहावीचा निकाल जाहीर होऊन अडीच महिने लोटून गेल्यावरही अकरावी प्रवेशाचा घोळ संपण्याचे नाव घेत नाही. सरकारने यंदा प्रथमच लागू केलेल्या राज्यव्यापी केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या फेऱ्यांचा फेरा अजूनही सुरूच आहे. एकीकडे अनेक कनिष्ठ महाविद्यालयांमधील जागा रिक्त दिसतात; तर दुसरीकडे काही लाख विद्यार्थी अजूनही प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत.हजारो विद्यार्थी-पालकांच्या डोक्यावर प्रवेश कोठे मिळणार, या प्रश्नाची टांगती तलवार उभी आहे. कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीचे वर्ग सुरू झाले, तरी प्रवेशाअभावी अनेक विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. अभ्यासक्रमाचा महत्त्वाचा वेळ वाया चालला आहे. आता गणेशोत्सव आणि पुढे दसरा-दिवाळीच्या सणासुदीच्या दिवसांत किती शैक्षणिक कामकाज होणार, हा प्रश्न आहे. त्यामुळे बहुतांश कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये पहिल्या शैक्षणिक सत्रातील अध्ययनाचे महत्त्वाचे दिवस केवळ सरकारी अट्टाहास आणि नियोजनशून्यतेमुळे वाया जाणार, असेच म्हणावे लागेल.

अकरावीच्या वर्गांतील शैक्षणिक कामकाज वेळेत सुरू व्हावे, या उद्देशाने शालान्त परीक्षा मंडळाने यंदा नियोजनबद्ध पद्धतीने परीक्षा आणि निकालाची प्रक्रिया पूर्ण केली. त्यामुळे १३ मे रोजी, म्हणजे विक्रमी वेळेत दहावीचा निकाल जाहीर झाला. मात्र, शिक्षण विभागाने यंदा कोणाकडूनही मागणी करण्यात आलेली नसताना राज्यस्तरीय केंद्रीय प्रवेश परीक्षेची कल्पना पुढे आणली आणि त्याला 'ऑनलाइन' प्रवेश सक्तीची जोड दिली. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि अमरावती अशा मोठ्या शहरांमध्ये ही पद्धत यशस्वी ठरली आहे; मात्र अगदी ५० विद्यार्थी असलेल्या गावांमध्येसुद्धा याच पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवण्याचा अट्टाहास अंगाशी आला. पूर्वी दहावीची परीक्षा झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडून अर्जांतील महत्त्वाची माहिती भरून घेण्यात येत असे. त्यामुळे निकालानंतर फक्त गुणांचा तपशील आणि महाविद्यालयांचे रकाने भरून अर्जपूर्ती होत असे; यंदा मात्र निकाल जाहीर झाल्यावरच ही प्रक्रिया सुरू झाल्याने अनेकांना अडचणींना सामोरे जावे लागले.अनेक गावांमध्ये वीजपुरवठ्याअभावी किंवा इंटरनेटची 'रेंज' नसल्याने अर्ज भरता येत नव्हते, अनेक विद्यार्थी आणि पालकांसह शिक्षकही या प्रक्रियेबाबत अनभिज्ञ होते. गोरगरीब विद्यार्थ्यांची लूटही सुरू झाली. मग तहान लागल्यावर विहीर खणल्याप्रमाणे, अडचणी येतील, तशी प्रक्रियेत बदल करण्याची मालिका सुरू झाली. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार मार्गदर्शन केंद्रे सुरू झाली, गावांमध्ये शाळेत तुटपुंज्या संगणकांवर प्रवेशअर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांच्या रांगा लागू लागल्या आणि 'इनहाउस कोटा'बाबत तीव्र नाराजी व्यक्त झाल्यावर नियमांत बदलही करण्यात आले. हे काम सोपविलेल्या कंपनीस पुरेसा अनुभव नसल्याचेही लक्षात आले आहे.ता जुलै महिना संपला, तरी या प्रक्रियेचे कवित्व सुरूच आहे. फक्त मुंबईतच पावणेचार लाखांपैकी पावणेदोन लाख विद्यार्थी अजूनही प्रवेशाविना आहेत. काही महाविद्यालयांमध्ये वर्ग सुरू झाले असले, तरी प्रवेशाअभावी विद्यार्थ्यांना हजर राहता येत नाही, अशी स्थिती आहे. हे बुडलेले कामकाज अतिरिक्त वेळ देऊन भरून काढावे लागणार, असे दिसते. सरकारचे संबंधित विभाग पुढील फेऱ्यांच्या नवनव्या तारखा जाहीर करत आहेत. सध्या प्रवेशाची सर्वांसाठी खुली फेरी (ओपन टू ऑल) सुरू असून पुरवणी परीक्षेतील विद्यार्थ्यांनाही त्याचा लाभ होऊ शकतो. मात्र, इथवर झालेल्या विलंबास जबाबदार कोण, हा प्रश्न बाकी राहतो.अकरावीच्या जागा या विद्यार्थीसंख्येच्या तुलनेत अतिरिक्त असल्याचे आढळून येत आहेत; तर दुसरीकडे महाविद्यालयांऐवजी बहिस्थ पद्धतीने शिक्षण, अकरावीऐवजी आयटीआय किंवा अन्य रोजगारक्षम अभ्यासक्रम पूर्ण करण्याकडेही विद्यार्थ्यांचा कल वाढताना दिसत आहे. तो लक्षात घेऊन पारंपरिक शिक्षणव्यवस्थेत काही बदल करता येतील का, याचाही विचार झाला पाहिजे. तसेच अकरावीला नामांकित महाविद्यालयांमध्येच प्रवेश हवा, हा विद्यार्थी-पालकांचा आग्रहसुद्धा या विलंबास काही प्रमाणात कारणीभूत आहे. एकुणात, त्वरेने निकालात कमावले, ते दिवस प्रवेश प्रक्रियेच्या घोळात गमावले, असेच यंदाचे चित्र आहे. किमान आता तरी कोणीही इच्छुक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, हे पाहतानाच तातडीने प्रक्रिया पूर्ण करून विद्यार्थ्यांना वर्गात बसण्याची संधी द्यावी, एवढीच अपेक्षा.

नियतीचा खेळ आणि गरिबीची जोड

जीवन जगणे आणि वेळ काढणे तश्या खूप भिन्न गोष्टी. जेव्हा पाऊस पडतो तर एक आनंद सगळीकडे असतो. कोणी पावसात गरम भजी खाण्याचे विचार करतो तर कोणी कडक गरम चहा पिण्याचा. पण तो दिवस जरा वेगळा वाटला कारण त्या रात्री खूप पाऊस चालू होता आणि जिल्ह्याचे मेन ठिकाण जो नेहमी गजबलेला परिसर छत्रपती शिवाजी महाराज चौक. त्या ठिकाणी एक आजी जवळपास सत्तर वर्षांची आपल जीवन पावसापासून बचावताना दिसली. छत्री धरून कशीबशी शरीर झाकण्याचा प्रयत्न करत होती. किती तफावत होती एकीकडे ज्यांना घर-दार सर्व असत तर दुसरीकडे असे लोक जीवनाची प्रत्येक घटका मोजताना दिसतात किती मन हेलावून टाकणारी परिस्थिती आहे.

एकूणच वरील परिस्थिती बघता त्या वर्दळ असणाऱ्या जागेवरून अनेक नागरिक जात होते पण एकालाही वाटले नाही की, ती एक स्त्री आहे, तिला कोणी हात द्यावा, रात्रीची उशीराची वेळ आहे हा प्रश्न का कोणालाच पडला नसेल लाडकी बहीण केवळ नावालाच आहेत का ही देखील कोणाची बहीण असेलच मग तिच्यासाठी का शासन प्रशासन तरतूद करत नाही. शासनाच्या योजनांमधून साठ वर्षांची अट येते. कोणाला मदत करण्याची इच्छा ही असेल तर ते करू शकत नाही. ही नक्कीच तिची अवहेलना नाही का? वृद्धाश्रम भरपूर आहेत पण ते केवळ नावाला त्याकडे शासन प्रशासन कितपत लक्ष देतात असे अनेक प्रश्न या आजी त्या रात्रीच्या प्रसंगातून सांगून गेल्या.

सरते शेवटी आपला देश महासत्ता होण्याकडे वाटचाल करतोय पण दररोज असे गरिबीने खितपत पडलेले लोक आपल्याला दिसतात. तर ही गरिबी यांना सोबतच घेऊन जाईल का? असे अनुत्तरित प्रश्न राहून जातात.

-ज्योत्स्ना चव्हाण गायकवाड
संपर्क: ९७६४२२३५३४

स्थानिक माथाडी कामगारांना डावलून परप्रांतीय कामगारांना रोजगार देण्याचा संतापजनक प्रकार उघडकीस

मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र होणार

उरण । प्रतिनिधी

उरण तालुक्यात विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपनी, प्रकल्प मोठ्या प्रमाणात कार्यरत असून या कंपनी,प्रकल्प मधून कोट्यावधीची उलाढाल होत आहे मात्र उरणमध्ये स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता बाहेरून आलेल्या परप्रांतीय कामगारांची मोठ्या प्रमाणात भरती अनेक कंपन्या व प्रकल्पात सुरू असल्याने स्थानिक असलेल्या बेरोजगारांचा, कामगारांचा रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. उरण तालुक्यात भेंडखळ येथे बीपीसीएल (भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड) हा राष्ट्रीय प्रकल्प कार्यरत आहे सदर प्रकल्प राष्ट्रीय असल्याने व उरण तालुक्यात भेंडखळ येथे असल्यामुळे सदर कंपनीने नोकरी मध्ये स्थानिकांना प्राधान्य द्यायला पाहिजे होते.मात्र सदर कंपनीला सध्या स्थानिक असलेल्या बेरोजगारांचा व कामगारांचा विसर पडला असून दिनांक १५ ऑगस्ट २०२५ व १६ ऑगस्ट २०२५ या दिवशी बीपीसीएलच्या कंपनी प्रशासनाने स्थानिक असलेल्या माथाडी कामगारांना सणा निमित्त सुट्टी दिली व याच सुट्टीच्या काळात परप्रांतीय कामगारांना कंपनीत प्रवेश देऊन त्यांना रोजगार दिला. मात्र सुट्टीच्या दिवशी स्थानिक कामगार काम करण्यास तयार होते पण स्थानिक माथाडी कामगारांना विश्वासात न घेता, त्यांना न कळवता सुट्टीच्या दिवशी परप्रांतीय कामगारांना रोजगार दिल्याने स्थानिक माथाडी कामगारांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.असाच प्रकार दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी सुद्धा झाला आहे.बीपीसीएल प्रशासन नेहमी स्थानिक माथाडी कामगारांना डावलून परप्रांतीय कामगारांना रोजगार देत असल्याने या बीपीसीएलच्या अन्यायाच्या निषेधार्थ बीपीसीएल

कंपनीत काम करणारे स्थानिक माथाडी कामगार असलेले टोळी क्रमांक २०४८ व टोळी क्रमांक ३०६८ च्या माथाडी कामगारांनी शनिवार दिनांक १६/८/२०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता बीपीसीएलच्या गेटवरच बिपीसीएल कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेराव घातला.टोळी नंबर ३०६८ चे माथाडी कामगार नवीन अखिल भारतीय माथाडी वाहतूक आणि जनरल कामगार संघटना या कामगार संघटनेशी सलंग्न आहे तर टोळी नंबर २०४८चे माथाडी कामगार हे महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनशी सलंग्न आहेत.दोन्ही टोळीचे स्थानिक माथाडी कामगार असलेले ९६ कामगारांनी यावेळी एकत्र येत बीपीसीएलच्या मनमानी व हुकूमशाही कारभाराचा निषेध केला. यावेळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक माथाडी कामगारांनी सदर कंपनीच्या अधिकारी वर्गावर मराठी माणसांचा अपमान करत असल्याचा व पैसे खाऊन परप्रांतीय कामगारांना कामे देत असल्याचा आरोप केला आहे. यावेळी कामगारांनी विविध कंपनीचे अधिकाऱ्यांना याबाबत जाब विचारला असता अधिकाऱ्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली आहेत. या समस्या संदर्भात व स्थानिक माथाडी कामगारांच्या मागणी संदर्भात बिपीसीएल कंपनीचे अधिकारी अरविंद चक्रवर्ती यांच्याशी संपर्क साधला असता आम्ही कोणावरही अन्याय केला नाही. आम्ही नियमानुसार काम करीत आहोत. आमचा स्थानिक कामगारांना विरोध नाही.मी मराठी माणसाचा अपमान केला नाही असे त्यांनी सांगितले. यावेळी मराठी माणसाचा अपमान केल्याचा आरोप कामगारांनी अरविंद चक्रवर्ती यांच्यावर केला असता हा आरोप चुकीचा असल्याचे अरविंद चक्रवर्ती यांनी सांगितले.सदर समस्या संदर्भात ऍडमिन इन्चार्ज यांच्याशी भेट घेऊन संवाद साधला असता ऍडमिन इन्चार्ज सुधीर कांबळे यांनी कोणतेही प्रतिक्रिया दिली नाही.कंपनीचे मेंटेनन्स मॅनेजर नारायण लांडे यांच्याशी संपर्क साधला असता आम्ही मेंटेनन्स साठी आलेलो आहोत. आम्हाला इतर गोष्टीची माहिती नाही असे मेंटेनन्स मॅनेजर नारायण लांडे यांनी सांगितले. कंपनीचे टर्मिनल मॅनेजर अरुण रेड्डी हे सुट्टीवर असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.सेक्युरिटी इन्चार्ज व्यांकाप्पा हावकोंडी यांना स्थानिक माथाडी कामगारांनी सर्वच परप्रांतीय कामगारांची ओळखपत्र, प्रवेशपत्र, माथाडी कामगार असलेले ओळखपत्र व इतर कागदपत्रे मागितली असता ते देण्यास सेक्युरिटी इन्चार्ज व्यांकाप्पा हावकोंडी यांनी नकार दिला. त्यामुळे वातावरण अधिकच तणावपूर्ण झाले होते. परप्रांतीय कामगार हे अनधिकृत पणे, बेकायदेशीर पणे कंपनीत काम करीत असल्याचा आरोप स्थानिक माथाडी कामगारांनी केला आहे. परप्रांतीय कामगार हे अधिकृत माथाडी कामगार नाहीत तसेच त्यांना सदर कंपनीत काम करण्याचा कोणताही अधिकार नसताना बेकायदेशीरपणे,अनधिकृतपणे कामावर घेतलेच कसे जाते ?बिपीसीएल सारख्या राष्ट्रीय महत्वाच्या राष्ट्रीय प्रकल्पात परप्रांतीयांना प्रवेश मिळतोच कसा ? सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या रासानायनिक द्रव्य पदार्थ बनत असलेल्या बिपीसीएल कंपनीत अप्रशिक्षित, विना अनुभवी परप्रांतीय कामगारांमुळे एखादी अनुचित किंवा वाईट घटना घडल्यास, अपघात झाल्यास त्याला जबाबदार कोण ? एखादी दुर्घटना होऊन एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याला जबाबदार कोण ? असा सवाल स्थानिक माथाडी कामगारांनी उपस्थित केला आहे. २००३ पासुन जे कामगार गुड्स ट्रान्सपोर्ट लेबर बोर्ड माथाडी कामगार रजिस्ट्रेशन आहेत तेच कामगार राहतील. त्याच कामगारांना बिपीसीएल कंपनीत काम मिळाले पाहिजे अशी स्थानिक माथाडी कामगारांची प्रमुख मागणी असून माथाडी कामगारांना सुट्टीच्या दिवशी किंवा इतर कोणत्याही दिवशी रोजगारात, नोकरीत प्राधान्य दिले नाही तर बिपीसीएल कंपनीच्या गेट समोरच तीव्र आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक माथाडी कामगारांनी बिपीसीएल कंपनी प्रशासनाला दिला आहे.

बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर सायबर अटॅक

अमरावती (वृत्तसंस्था)-अमरावती जिल्ह्यातील नागरिकांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर मोठा सायबर हल्ला झाला आहे. त्यामुळे खातेधारकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बँकेच्या नेटवर्क आणि ग्राहकांच्या व्यवहारांची माहिती हॅकर्सपर्यंत पोहोचल्याची भीती व्यक्त केली जात आहे.या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार या सायबर हल्ल्यात बँकेच्या बडनेरा आणि मंगरूळ दस्तगीर शाखांना विशेषतः लक्ष्य करण्यात आले होते. असे सांगितले जात आहे की, बँकेच्या इतर शाखा देखील सायबर हल्लेखोरांच्या रडारवर आहेत. धक्कादायक बाब म्हणजे हल्लेखोरांनी थेट बँकेच्या संगणक प्रणालीमध्ये प्रवेश केला आणि विंडोज होल्डरवर एक नवीन फाइल तयार केली. यामुळे बँकेच्या नेटवर्क आणि ग्राहकांच्या व्यवहारांची माहिती हॅकर्सपर्यंत पोहोचल्याची भीती व्यक्त केली

जात आहे.या घटनेनंतर बँकेत मोठी खळबळ उडाली आहे आणि सुरक्षा व्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शनिवारी संचालक मंडळाची आपत्कालीन बैठक बोलावली आहे. या बैठकीत बँकेच्या आयटी सुरक्षेवर आणि सायबर हल्ल्याच्या चौकशीसाठी पुढील पावले उचलण्यावर चर्चा केली जात आहे.सायबर गुन्हे विभागालाही या घटनेची माहिती देण्यात आली आहे आणि हल्ल्याचा शोध घेण्यासाठी तांत्रिक तपास सुरू करण्यात आला आहे. जिल्हा बँकेच्या हजारो खातेदारांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, त्यामुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री बच्चू कडू यांच्या अपात्रता प्रकरणाची सुनावणी सुरु आहे. विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी कडू यांना अध्यक्ष आणि संचालक पदासाठी अपात्र ठरवले होते. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या अपात्रतेला स्थगनादेश दिला आहे. सहकार विभागाने १६ जून रोजी कडू यांना अपात्र घोषित केले होते. नाशकात केलेल्या आंदोलनासाठी एक वर्षाची शिक्षा झाल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. त्यांना पुढील पाच वर्षे निवडणुकीत सहभागी होण्यास मनाई करण्यात आली होती. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अन्वये ही कारवाई करण्यात आली होती. सहकार विभागाने कडू यांच्या उर्वरित कालखंडासाठी पोटनिवडणूक घेण्याची तयारी सुरू केली होती. या निवडणुकीत त्यांना उमेदवार म्हणून सहभागी होता येणार नव्हते. मात्र स्थगनादेशामुळे ही प्रक्रिया थांबली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत अनेक विविध विकास कामासह अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आहे. पक्ष मजबूत करण्यावर जोर

पनवेल । प्रतिनिधी

पनवेल जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची मीटिंग पक्षाच्या कळंबोली येथील जनसंपर्क कार्यालय येथे आज (दिनांक १७) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस भीमसेन माळी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात विविध विषयावर चर्चा झाली त्यात महत्वाचे म्हणजे काही महिन्यात पनवेल महानगर पालिका निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या डोळ्यासमोर ठेवून प्रभाग मीटिंग ठेवून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्वयंघोषित असलेले पदाधिकारी पक्षात दुफळी माजविण्याचा प्रयत्न करत आहेत.आपला स्वार्थ साधत आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांना गुमराह करत आहेत. अशा पदाधिकाऱ्यांपासून सावध राहायला पाहिजे. यांनी पक्षाचा वापर फक्त

स्वतःच्या स्वार्थासाठी केला आहे. त्याकडे दुर्लक्ष करून आपण संघटना बांधण्याचे काम जोमाने करण्याचा निर्धार केला. कामोठे शहर अध्यक्ष अजिनाथ सावंत यांनी खारघरध्ये झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या निषेध करत ज्या कार्यक्रमाला जिल्हा अध्यक्ष नाहीत तो कार्यक्रमच अवैध ठरतो, या कार्यक्रमाला प्रोटोकॉल पाळला जात नाही असा कार्यक्रमाला जायला नको होते. जिल्हाध्यक्ष महादेव पाटील यांची शिफारस घेऊन या, जिल्हा कमिटी मार्फतच निर्णय घेतील ते योग्य असतील स्वंयघोषित पदाधिकारी आहेत ते चुकीचे आहे यावर कुठेतरी कारवाई व्हायला पाहिजे. याला आळा घातला गेला पाहिजे असे परखड मत व्यक्त केले.बळीराम नेटके यांनी सांगितले की आपल्या स्वार्थासाठी शिवदास कांबळे पक्षात दोन गट पडण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचे हे घाणेरडे राजकारण निवडणुका तोंडावर आल्या नंतर चालू होते. पक्ष बांधण्यासाठी त्यांचे काडीचेही योगदान नाही. त्यांच्यामुळे पक्षाची हानी होते आहे. ते पक्षा विरोधात कारवाया करत आहेत असा खळबळजनक आरोप नेटके यांनी केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष महादेव पाटील, अल्पसंख्यक विभाग पनवेल जिल्हा अध्यक्ष हबीब शेख, सामाजिक न्याय महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सुनील सावर्डेकर, सुरेश फडके, चंद्रशेखर जळे, रामदास नारकर, रघुनाथ राजपुरोहित, खारघर ग्रामीण अनिल पाटील, सोशल मीडिया जिल्हा प्रमुख विलास खरटमोर, सचिव रमेश जगदाळे, सूर्यकांत आंब्रे, संतोष शिंदे, मुस्ताक पटेल, एस डी हवालदार, कैलास महादेव पाटील, महिला अध्यक्ष कळंबोली शहर अश्विनी रमेश जगदाळे, बबनराव वसंतराव पवार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

विश्व हिंदू परिषदेच्या वतीने प्रफुल्ल कुलकर्णी यांना धर्मवीर जिवन गौरव पुरस्कार प्रदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विश्व हिंदू परिषद अंबाजोगाई प्रखंड च्या वतिने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोरजी मुंदडा, डॉ.शरदराव हेबाळकर, साईनाथ उपरे, डॉ.गोपाळ चौसाळकर,प्रणव रायचुरकर, गणेश पांचाळ, चंद्रकांत घोलप, कृष्णा देशमुख उपस्थित होते. विश्व हिंदू परिषदेच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.प्रास्ताविक डॉ चौसाळकर, चंद्रकांतजी घोलप म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाच्या माध्यमातून हिंदू समाज संघटनाचे कार्य सुरू आहे.हिन्दु समाजासमोर अनेक समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कृष्णा देशमुख म्हणाले की, प्रफुल्ल कुलकर्णी यांनी राष्ट्र कार्यासाठी जिवन झोकून दिले.देशापुढील समस्या सोडविण्यासाठी हिंदू तरुणांनी संघटीत होऊन कार्य केले पाहिजे.समाज देश व संस्कृती टिकली पाहिजे असे आवाहन केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले की,समाज कार्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे.साधु संतांनी समाज जोडण्याचे काम केले.प्रफुल्ल नानांनी प्रतिकूल परिस्थितीत हिंदू समाज जोडण्याचे कार्य केले, कार्यकर्ते जोडण्याचे काम केले.हा सत्कार नानांच्या लढवय्ये पणाला आहे.या कार्यासाठी कै.वहिनींची खंबीरपणे साथ होती.पालकांनी आपल्या मुलांवर उत्तम संस्कार करावेत तरच समाज एकसंघ निर्माण होईल. प्रफुल्ल कुलकर्णी म्हणाले की, हिंदू समाज जागृती चे काम केले तो खारीचा वाटा आहे.सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे ज्या मार्गाने विजय मिळवता येतो तो मार्ग अवलंबला पाहिजे

मला हिन्दू समाजाची साथ मिळाली म्हणूनच कार्य करु शकलो.आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपला पाहिजे.पण आमचा शत्रूबोध संपल्यामुळे हिंदू समाज संघटीत होण्यास अडचण होत आहे.समाजात काम करतांना समाज हित जोपासले गेले पाहिजे असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ.हेबाळकर म्हणाले की, मला कार्यकर्त्यांचे कौतुक करण्याची संधी मिळाली व्यापक मंथन झाले.देशात हिंदूंचे एक मोठे जनसंघटन व कार्यकर्ते उभे राहिले पाहिजे. तरच समाज उभा राहिल.हे कार्य संघाने उभे केले.अशा कार्यकर्त्यां पैकी एक प्रफुल्ल कुलकर्णी होत.हिंन्दू एकजुट च्या माध्यमातून अनेक तरुण जोडले त्याचेच रूपांतर नंतर बजरंग दलात झाले.मी समाजासाठी काय करू शकतो याचा विचार केला पाहिजे.असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.आरती सोनेसांगवीकर,तर आभार प्रदर्शन जयदीप चिलमे यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन ड कल्याणीताई विर्धे यांनी केले.याप्रसंगी सर्व हिन्दूत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी साईनाथ उपरे यांच्या वतीने गौशाळे साठी मोफत औषधी वाटप करण्यात आली.

परळी शहराला पाणी पुरवठा करणारे नागपूर येथील वाण धरण ओसंडून वाहत आहे.

युवा नेते यशराज पंडित यांचा वाढदिवसानिमित्त बंजारा समाजाच्या वतीने शांताराम महाराज, गिन्यानदेव महाराज, मानसिंग महाराज, कैलास राठोड, दत्ता राठोड, छगन जाधव, विजय राठोड, किसन राठोड आदींनी हृदयसत्कार करून शुभेच्छा दिल्या

खासदार वाकचौरे यांच्याहस्ते गोपाल भानुशाली यांना भारत समाज भूषण पुरस्कार

ठाणे । प्रतिनिधी

धर्मवीर छत्रपती संभाजी प्रतिष्ठान महाराष्ट्र च्यावतीने दिला जाणारा भारत समाज भूषण पुरस्कार यंदा ठाणे शहरातील सामाजिक कार्यकर्ते श्री गोपाल लालजी भानुशाली यांना जाहीर करण्यात आला होता. दरवर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे प्रतिष्ठान निवड समिती व प्रा. डॉ बी एन खरात संचालक समृद्धी पब्लिकेशन सिंधुदुर्ग यांनी दिली आहे प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा भारत समाज भूषण पुरस्काराने सन्मानित केले जाते यावर्षी समाज प्रबोधन, सामाजिक शैक्षणिक दुर्ग सर्वधन ग्रंथालय अशा विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना सदर पुरस्काराने सन्मान करण्यात येतो.

शिर्डी येथे पार पडलेल्या शानदार सोहळ्यात ठाण्यातील सामाजिक कार्यकर्ते गोपाल लालजी भानुशाली यांना २०२५ भारत समाज भुषण पुरस्कार

शिर्डी लोकसभेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रसंगी प्राध्यापक डॉ बी एन खरात संचालक समृद्धी पब्लिकेशन सिंधुदुर्ग, श्री विजय पटवर्धन प्रसिद्ध अभिनेते, रविंद्र गुंजाळ संस्थापक अध्यक्ष धर्मवीर छत्रपती संभाजी राजे प्रतिष्ठान महाराष्ट्र व आदी मान्यवर उपस्थित होते.

दिव्यात मनसेने बंगाली व इंग्रजी पाट्यानां फासले काळं

मनसेच्या शाखाप्रमुख निकिता सालप व मनसैनिक झाले आक्रमक

ठाणे । प्रतिनिधी

दिव्यात मराठी पाट्यांच्या मुद्यावर मनसे पुन्हा एकदा आक्रमक झाल्याचं दिसून आलं. दिव्यातील दुकानांवरील इंग्रजी व बंगाली पाट्यांविरोधात मनसे आक्रमक झाली आहे. मा.आमदार राजू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरप्रमुख तुषार पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज दिवा मनसेच्या शाखाप्रमुख सौ. निकिता सालप यांनी स्टेशन परिसरात काही इंग्रजी व बंगाली पाट्यांना काळे फासत मनसैनिकांची जोरदार घोषणाबाजी केली आहे. मराठी पाट्या लावा नाहीतर तुमच्या तोंडाला काळे फासले जाईल असा इशारा मनसेने दिला आहे.

येत्या दहा दिवसात मराठी पाट्या दिसल्या नाहीत तर मनसे खळखट्याक स्टाईलने उत्तर देईल असा इशारा देण्यात आला आहे. मनसेने सुरुवातीपासून मराठी पाट्यांवरुन आक्रमक भूमिका घेतलीय. त्यात कोर्टाने दिलेल्या मुदती नंतरही दिव्यात अजून काहीं दुकानदारांनी पाट्या मराठी भाषेत केल्या नाहीत असे यावेळी मनसेच्या निकिता सालप यांनी बोलताना स्पष्ट केल. प्रसगी उपशाखा अध्यक्ष वैदही सावंत, विद्यार्थी सेनेचे मीनल वडये, सागर तळेकर, नितीन पाटील, प्रतीक मोयनक, मनीष वडये, देवदत्त पाटील आदी मनसे सैनिक उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनानिमित्त दिव्यांगांना व्हीलचेअरचे वाटप

पनवेल । प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनानिमित्त आरिन फाऊंडेशन आणि रोटरी क्लब मिलेनियम सिटी वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. २८ येथे विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत १५ दिव्यांग मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत व्हीलचेअरचे वाटप करण्यात आले.

या सामाजिक उपक्रमात आरिन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. नितेश मिसाळ, फाऊंडेशनचे सदस्य तसेच रोटरी मिलेनियम सिटी क्लबच्या अध्यक्षा सौ. अर्चना चोरारिया, उपाध्यक्ष श्री. रमेश सोनवणे, सचिव श्री. अशोक शहा व क्लबचे इतर मान्यवर सदस्य उपस्थित होते. तसेच एस. के. कॉलेजच्या रोट्रॅक्ट क्लबच्या सदस्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

यावेळी आर्यन् एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अविनाश म्हात्रे, नवी मुंबई महानगरपालिकेच्या समग्र शिक्षण

अभियान टीमच्या प्रमुख सौ. अनिता मोजाड, सौ. मनाली आंब्रे आलिया व रंजन इन्स्टिट्यूट, बांद्रा येथील दिव्यांग मित्र यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष सहकार्य केले.दिव्यांगांना मोफत व्हीलचेअर मिळाल्यानंतर त्यांच्या तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद द्विगुणित झाला होता. त्यांनी समाधान व्यक्त करताना दानशूर व्यक्तींचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माननीय सावंत सर यांनी केले, तर या कार्यक्रमाची प्रस्ताविका माननीय श्री अविनाश म्हात्रे यांनी केली. संपूर्ण नियोजनात शाळेच्या मुख्याध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

उलव्यात महेंद्रशेठ घरत यांची ५,५५, ५०० ची दहिहंडी दणक्यात साजरी!

उलवे । प्रतिनिधी

उलव्यात शनिवारी दहिहंडीचा थरार पाहायला मिळाला. सेक्टर १८ येथे यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था, शेलघर, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी आणि उरण विधानसभा युवक काँग्रेस यांच्या वतीने दहिहंडीचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे ५ लाख ५५ हजार ५०० रुपयांची बक्षिसे दहिहंडीसाठी होती. यावेळी अनेक गोविंदा पथकांनी सलामी दिली.शिव स्वराज्य माऊली गोविंदा पथक, कळंबोली यांनी पहिल्यांदा सलामी दिली; तर उरणकन्या महिला

गोविंदा पथक यांनी दहिहंडी उत्सवात दमदार सलामी दिली.

पहिला क्रमांक आई एकवीरा गोविंदा पथक, दारावे; मानखुर्द गाव महिला गोविंदा पथक दुसरा क्रमांक; तर आई एकवीरा महिला गोविंदा पथक, वडाळा यांना तिसऱ्या क्रमांकाने गौरविण्यात आले. एकूण ६६ गोविंदा पथकांनी पाच ते सहा थरांची सलामी दिली.यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे युवक अध्यक्ष शिवराज मोरे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, श्रद्धा ठाकूर, निखिल ढवळे, श्रीकांत घरत, शंभो म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिवराज मोरे म्हणाले, दहिहंडीचे उत्तम नियोजन आणि गोविंदा पथकांचा उत्साह कौतुकास्पद आहे. महेंद्रशेठ घरत यांच्या काटेकोर नियोजनाची महती ऐकून होतो, आज त्याची प्रचिती आली. महिला गोविंदा पथकांनी हिरीरीने सहभाग घेतला. त्याबद्दल त्यांचे आणि आयोजकांचे मनापासून अभिनंदन!

किरीट पाटील, कुणाल घरत, रोहित घरत आणि एम. जी. ग्रुपने दहिहंडीचे यशस्वी नियोजन केले होते. राजेंद्र भगत यांनी सूत्रसंचालन केले. अतिशय उत्साहात दहिहंडी साजरी करण्यात आली.

कर्जतमध्ये सुवर्ण छाया बालविकास मंदिर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

कर्जत । प्रतिनिधी

कर्जतमध्ये सुवर्ण छाया बालविकास मंदिर येथे स्वातंत्र्य दिनाचा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला त्यानिमित्त सकाळी ठिक ०९ वाजता कर्जत रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) पोलिस निरीक्षक मा. रणवीर सिंग, कर्जत व कोकण सिंधू सामाजिक शैक्षणिक कृषी बहुउद्देशीय संस्थांचे संस्थापक सीइओ सचिन देडे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी स्वातंत्र्य दिनानिमित्त समाजसेवक गणेश कांबळे , संगीता कांबळे यांच्याकडून गोर गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.यावेळी संस्थापक अध्यक्ष नितीन देडे , राजेंद्र जंगम बीजेपी शक्ती केंद्र प्रमुख , आरपीएफ पोलिस टिम ,माजी नगरसेवीका उज्वला हजारे सुभाष हजारे ,स्वाती कोकणे , रेश्मा सागर भोसले पुजाताई देडे , पुजा रेड्डी , अमित कदम, खंडू हातागळे, राहुल लेले सिध्दीविनायक रेसिडेन्सी भिसेगाव राधे गलेक्सी, क्रांतीनगर नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'डिकोडिंग डिमेंशिया' साठी आंतरराष्ट्रीय संवाद संशोधन,समाजशास्त्रीय दृष्टिकोन आणि भविष्याचे मार्ग

मुंबई । प्रतिनिधी

डॉ. बी. एम. एन. कॉलेज ऑफ होम सायन्स (स्वायत्त) आणि श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला व वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभाग व 'आजी केअर सेवक फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'डिकोडिंग डिमेंशिया: रिसर्च, सोशियोलॉजिकल अप्रोच आणि पाथवेज' या विषयावर रुसा प्रायोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. परिषदेचे बीजभाषण मानसोपचारतज्ज्ञ डॉ. नीलेश शाह यांनी आजोबा, चला शाळेत जाऊ या या संकल्पनेच्या माध्यमातून केले. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी फिजिओथेरपी, मानसिक व्यायाम आणि डिजिटल साक्षरता यांचे महत्त्व अधोरेखित केले.आजी केअर सेवक फाउंडेशन चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश नारायण बोरगांवकर ह्यांनी संख्या आणी सुरुवातीच्या लक्षणांच्या बाबतीत स्मृतीवंश आढावा व परिस्थिती मांडाऊन सांगितली.त्यांनी सांगितले की सध्या भारतात ८८ लाख ज्येष्ठ नागरिक स्मृतीवंश ने ग्रस्त आहे व ही संख्या २०३६ मध्ये १ कोटी ७० लाख होईल. डॉ. संतोष बांगर यांनी डिमेंशियाची कारणमीमांसा, आहार व व्यायामाचे महत्त्व सांगितले, तर डॉ. अर्चना पत्की यांनी कुटुंबातील तरुणांनी वृद्धांच्या भावना समजून घेण्याची गरज अधोरेखित केली.

प्रश्नोत्तरांवर आधारित चर्चासत्रात डॉ. खालप यांनी डिमेंशियाग्रस्त व्यक्तींच्या काळजीत कुटुंबाची भूमिका विशद केली, तर प्रसाद भिडे यांनी काळजीवाहकांची निवड करताना विश्वासार्ह संस्था व निकष यांचे महत्त्व स्पष्ट केले. ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर यांनी एमडब्ल्यूपीएससी कायदा, २००७, मानसिक आरोग्य कायदा, २०१७ व अपंग व्यक्तींचे हक्क कायदा, २०१६ यांची माहिती देत मुलांनी आपल्या वृद्ध पालकांना सोडू नये, हा स्पष्ट संदेश दिला.दुपारच्या सत्रात अमेरिकेतील प्राजक्ता पाडगावकर यांनी 'होप फॉर अल्झायमर' या सादरीकरणातून निदानातील आधुनिक उपकरणे व काळजी घेण्याच्या उपायांवर प्रकाश टाकला. अमेरिकेतील प्रा. मानसी पै यांनी संज्ञानात्मक वृद्धत्व हे जैविक आणि मानसिक यंत्रणांशी कसे निगडीत आहे, याचे शास्त्रीय विवेचन सादर केले. त्यांच्या मते, फक्त जैविक कारणे नव्हे तर जीवनशैली देखील मेंदूच्या कार्यक्षमतेवर परिणाम करते.

क्रिएटिव्हिटीचा विचार व्यक्तीला सक्षम आणि यशस्वी बनवतो-उपसंचालक नितिका विलास

बालमॉडेल्सच्या रॅम्पवॉकने उजळला तुलसी कॉलेजचा 'चॅम्प ऑन रॅम्प' फॅशन शो

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचालित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय लहान मुलांचा फॅशन शो 'चॅम्प ऑन रॅम्प – सीझन १' हा भव्य सोहळा रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी रामकृष्ण लॉन, कॅनॉल रोड, बीड येथे उत्साहात पार पडला.उद्घाटन प्रसंगी आयकर विभागाच्या उपसंचालिका नितिका विलास यांनी, क्रिएटिव्हिटी ही केवळ पदवी नसून एक विचारप्रक्रिया आहे. हा विचार आपण कोणत्याही क्षेत्रात उतरवू शकतो आणि हाच क्रिएटिव्हिटीचा विचार व्यक्तीला सक्षम व यशस्वी होण्यास मदत करतो, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी चला हवा येऊ द्या फेम अंकुर वाढवे होते, तर अध्यक्षस्थानी प्रा.प्रदीप रोडे आणि विशेष अतिथी सौ.दीपा रोडे उपस्थित होत्या. राज्यभरातील १६७ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. परीक्षक म्हणून कोयल भलगट (अहमदाबाद), पूर्वा बाराई (नागपूर) आणि प्रवीण पव्हारे (छत्रपती संभाजीनगर) यांनी काम पाहिले.

तीन वयोगटांमध्ये पार पडलेल्या स्पर्धेत लहान मॉडेल्सनी वेगवेगळ्या शैलीत, रंगीबेरंगी पोशाखात रॅम्पवॉक केले. कार्यक्रमात विविध डिझायनर्सचे डिझाईन्स, नृत्य आणि संगीताचे आकर्षक सादरीकरण पाहायला मिळाले, ज्यामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

बेस्ट चॅम्प ऑन रॅम्प ३ ते ६ वयोगटात तृष्णा लोढा प्रथम, जान्हवी जोगदंड द्वितीय व उन्नती वडमारे तृतीय ठरले. ७ ते ११ वयोगटातील फॅशन मॉडेल्सनी आपली छाप सोडली, तर १२ ते १५ वयोगटातील बालकांनी आकर्षक रॅम्पवॉकद्वारे प्रेक्षकांची दाद मिळवली. बेस्ट डिझायनर मध्ये राधा मुगळे प्रथम, वैष्णवी होके द्वितीय आणि साक्षी जेथे तृतीय ठरल्या. सर्व गटांमधील विजेत्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व प्रोफेशनल फोटोशूट व विशेष सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे संचलन निशा कुचेकर यांनी केले, तर आयोजनाची जबाबदारी महाविद्यालयाचे प्राचार्य व कर्मचारीवर्गाने यशस्वीपणे पार पाडली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी न्यू पंकज ज्वेलर्स, कॅनरा बँक, एसबीएच सरस्वती, श्री लक्ष्मीनारायण जनरल स्टोअर्स, ईडॅक आणि अलंकार ड्रेस्सेस यांसारख्या प्रायोजकांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला बीडसह परिसरातील रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला

शालेय स्तरावर घुमू लागले निवडणुकीचे वारे

बहुजन कल्याण विभागाच्या साने गुरुजी शाळेचा स्तुत्य उपक्रम

केज । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना लोकशाही समजावी मतदानाच्या हक्काबद्दल जनजागृती व्हावी आणि निवडणूक प्रक्रिया समजण्यासाठी गोपनीय पद्धतीने मतपत्रिकेद्वारे मुलांनी बजावला मतदानाचा हक्क. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवलेल्या आणि सतत उपक्रमशील शाळा म्हणून संपूर्ण राज्यात बहुजन कल्याण विभागा मध्ये गणल्या गेलेल्या साने गुरुजी निवासी विद्यालयात मुलांनी गिरवले लोकशाहीचे धडे.आज साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्रा.डॉ.कविताताई गित्ते मॅडम यांच्या मार्गदर्शनात आणि संकल्पनेतून विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक अतिशय उत्साहात पार पडले. दोन दिवसांपूर्वी निवडणुकीची अधिसूचना ज्ञानेश्वर पवार यांनी जाहीर केली. त्याप्रमाणे सर्व इच्छुक उमेदवारांनी आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. प्राप्त अर्जांची छाननी करून चिन्हांचे वाटप करण्यात आले निवडणूक मतपत्रिका जाहीर करण्यात आली उत्साहात प्रचाराला सुरुवात केली. प्रत्यक्षात आज मतदानाला सुरुवात झाली. या मतदान प्रक्रियेसाठी मतदान केंद्राध्यक्ष म्हणून दीपक साखरे, मतदान अधिकारी म्हणून ज्ञानेश्वर पवार,नागनाथ गुजर,सचिन भांगे, बाबासाहेब चाटे, मजहर शेख,वालचंद लाड यांनी निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

'आपकीजय' परिवाराच्या दिंडी यात्रेत डॉक्टर विजयकुमार गावित यांचा सहभाग

नंदुरबार । दिपक गोसावी

आदिवासी संत गुलाम महाराज यांच्या शिकवणीला उजाळा देण्यासाठी 'आपकीजय' परिवारातर्फे दरवर्षी काढण्यात येणाऱ्या दिंडी यात्रेत राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित, माजी खासदार डॉक्टर हिना गावित आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉक्टर सुप्रिया गावित यांनी सहभाग घेतला. श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी, म्हणजेच १८ ऑगस्ट रोजी, या मान्यवरांनी हातोडा पूल येथून पायी चालत दिंडीत सहभाग नोंदवला.

या दिंडीमध्ये नंदुरबार जिल्ह्यासह गुजरात सीमेवरील अनेक गावांचे भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तळोदा तालुक्यातील रंजनपूर येथे संत गुलाम महाराजांच्या समाधीस्थळी ही दिंडी पोचते, जिथे श्रावण अमावस्येला सामूहिक प्रार्थना आणि मोठा सोहळा पार पडतो.

दिंडीत सहभागी होण्यापूर्वी डॉक्टर विजयकुमार गावित, डॉक्टर हिना गावित आणि डॉक्टर सुप्रिया गावित यांनी संत गुलाम महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रार्थना केली.

यावेळी डॉक्टर विजयकुमार गावित यांनी 'आपकीजय' परिवाराच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले की, १९३७ मध्ये संत गुलाम महाराजांनी आदिवासी समाजाला व्यसनमुक्ती, साक्षरता, आरोग्य, संघटन आणि श्रद्धापूर्वक आचरणाचे महत्त्व पटवून दिले. दिंडीच्या माध्यमातून आजही हे कार्य जिवंत ठेवले जात आहे, हे कौतुकास्पद आहे.

सीमेन्सची सामाजिक बांधिलकी

सीमेन्स व्यवस्थापन आणि वर्कर्स युनियनच्या वतीने इन्फंटच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

केज । गौतम बचुटे

सीमेन्स लिमिटेड व्यवस्थापन व सीमेन्स वर्कर्स युनियन यांच्या सहकार्याने आनंद ग्राम, पाली येथील इन्फंट इंडिया मधील अनाथ मुलांना प्रेम आणि सामाजिक बांधलकीच्या भावनेतून शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले.

बीड जिल्ह्यातील इन्फंट इंडिया हे नाव आता राज्यासह परराज्यात देखील परिचित आहे. दत्ता बारगजे आणि सौ संध्याताई बारगजे हे बीड जिल्ह्यातील पाली येथील डोंगरावर उभारलेल्या आनंदवन येथे इन्फंट इंडियाच्या माध्यमातून एच आय व्ही बाधित आणि अनाथ मुलांचे आई वडील म्हणून आभाळ करीत आहेत. विशेष म्हणजे त्यांनी सरकारी नोकरी सोडून हे साजसेवेचे सतीचे वाण स्वीकारलेले आहे. दरम्यान या त्यांच्या कार्याची माहिती छत्रपती संभाजी नगर येथील सीमेन्स कंपनीत काम करीत असलेले आणि सीमेन्स हौसिंग कॉलनीचे सेक्रेटरी सतीश बचुटे यांना माहिती झाल्याने त्यांनी ही माहिती त्यांच्या सहकाऱ्यांना दिली. तेव्हा पासुन मागील काही वर्षा सिमेन्स गणेश मंडळ, सीमेन्स वर्कर्स युनियन हे इन्फंट इंडिया आणि दत्ता बारागजे व सौ संध्याताई बारगजे यांच्या संपर्कात असून ते इन्फंट इंडिया आणि तेथील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारे मदत करीत असतात.

दि. १७ ऑगस्ट रोजी सीमेन्स एम्प्लॉईज मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी (लि.) मुंबईच्या मार्फत सोसायटीचे सेक्रेटरी मनोज मोहिते, सीमेन्स वर्कर्स युनियन शाखा छत्रपती संभाजीनगरचे ब्रँच सेक्रेटरी कॉम्रेड दत्तू भंडे, सीमेन्स मल्टीस्टेटचे संचालक अशोक शेळके व सीमेन्स हौसिंग सोसायटी छत्रपति संभाजीनगरचे सेक्रेटरी सतिश बचुटे यांनी इन्फंट इंडिया (आनंदग्राम) येथील मुलांना स्कूल बॅग, आसन पट्या, वॉटर बॅग व खाऊचे वाटप केले. यावेळी इन्फंट इंडियाचे दत्ता (भाऊ) बारगजे व सौ. संध्याताई बारगजे हे उपस्थित होते.

या प्रसंगी मुला मुलिंच्या चेहर्यावर आनंद ओसंडुन वाहत होता.

शिवदास थळकरी यांची राष्ट्रवादी काँग्रेस युवक केज तालुका अध्यक्षपदी निवड

केज । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक आघाडीच्या संघटनात्मक बांधणीस गती देण्यासाठीनुकतीच केज तालुक्यात नवीन पदनियुक्ती करण्यात आली.शिवदास उमाकांत थळकरी यांची युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या केज तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिवदास थळकरी हे सामाजिक कार्यात नेहमीच सक्रिय राहिले असून युवकांना राजकारणात व समाजकारणात सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.पक्षाच्या विचारधारे प्रति निष्ठा ठेवून त्यांनी विविध स्तरांवर काम केले. असून त्यामुळेच त्यांच्या वर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.या नियुक्तीनंतर थळकरी यांनी पक्षश्रेष्ठीं प्रती कृतज्ञता व्यक्त केली तसेच आगामी काळात केजतालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद अधिक वाढविण्यासाठी व युवकांना राजकीय व सामाजिक क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.दरम्यान, त्यांच्या

निवडीबद्दल तालुक्यातील पक्षाचे कार्यकर्ते,पदाधिकारी व युवकांनी आनंद व्यक्त केला असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या नियुक्ती मुळे केज तालुक्यातील युवकांमध्ये नवचैतन्य संचारेल,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पनवेलमध्ये 'मयूखा' महोत्सव;भारतीय शास्त्रीय नृत्याचा उत्सव

पनवेल । प्रतिनिधी

दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी पनवेलची सांस्कृतिक भूमी भारतीय शास्त्रीय नृत्याच्या रंगांनी उजळून निघणार आहे आणि त्याचे कारण आहे, नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटरच्या वतीने आपल्या समृद्ध नृत्य वारशाच्या जतन व प्रसारासाठी समर्पित एक महोत्सव आणि त्याचे नाव आहे मयूखा. विशेष म्हणजे परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा एवढा मोठा कार्यक्रम रसिकांसाठी विनाशुल्क असणार आहे.

पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालय या ठिकाणी होणारा हा कार्यक्रम २३ ऑगस्टला सायंकाळी ०६ वाजता सुरू होणार आहे. यामध्ये नालंदा बानीतील मोहिनीयट्टम ख्यातनाम वादकांचा थेट वाद्यमेळ पनवेल व परिसरातील कला-रसिकांसाठी एक सांस्कृतिक मेजवानी असणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व मयूखा प्रायोजक परेश ठाकूर, नॅशनल टेलिफोन ॲडव्हायजरी कमिटी सदस्य श्री. रमेश, विशेष पाहुणे म्हणून नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उमा रेले, मोहिनीअट्टम नृत्यांगना व संस्थापिका निदेशिका डॉ. डिंपल नायर तर सेलिब्रिटी पाहुणे म्हणून मल्याळम अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना देवी चंदना, मराठी अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना तन्वी पळव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पद्मभूषण डॉ. कनक रेले यांच्या शिष्या व नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी नयना प्रकाश यांच्या संकल्पना व दिग्दर्शनाखाली हा उत्सव आयोजित होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077